



# ‘पारसी डेअरी’चा परवाना निलंबित : अन्न सुरक्षा उल्लंघनामुळे एफडीएची कारवाई

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – मुंबईतील मरीन लाइन्स परिसरातील शतकभर जुने आणि प्रसिद्ध पारशी डेअरी फार्मवर एफडीएने कारवाई करत संस्थेचा परवाना निलंबित केला आहे.

बुधवारी करण्यात आलेल्या तपासणीत स्वच्छतेसंदर्भातील नियमांचे उल्लंघन आढळल्याचा आरोप करण्यात आला आहे. १९१६ मध्ये स्थापन झालेले पारशी डेअरी फार्म



हे मुंबईतील ऐतिहासिक आणि प्रतिष्ठित खाद्य आस्थापनांपैकी एक मानले जाते. मात्र, तपासणीत आढळलेल्या कथित स्वच्छतेच्या त्रुटींमुळे ऋऊअ ने ही कारवाई केली. यापूर्वीही एफडीएने स्वच्छतेच्या नियमांचे उल्लंघन झाल्याच्या कारणावरून मुंबईतील प्रसिद्ध के. रुस्तम आईस्क्रीम पार्लर, शालीमार रेस्टॉरंट आणि नूर मोहम्मदी रेस्टॉरंट यांच्या परवान्यांवरही निलंबनाची कारवाई केली होती.

अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्याने मुंबईतील पारसी डेअरी फार्म, प्रिन्सेस स्ट्रीट, मरीन लाईन्स, कालबादेवी येथील आस्थापनेवर केलेल्या तपासणीत अन्नसुरक्षा व स्वच्छतेसंदर्भातील अनेक गंभीर त्रुटी आढळून आल्याने संबंधित आस्थापनेचा एफएसएसएआय परवाना तात्काळ प्रभावाने निलंबित करण्यात आला आहे. दिनांक १४ जुलै २०२६ रोजी अन्न सुरक्षा अधिकारी यांनी केलेल्या तपासणीत अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ तसेच अन्न व्यवसाय परवाना व नोंदणी नियम, २०११ मधील विविध तरतुदींचे गंभीर उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आले. तपासणीनंतर सादर करण्यात आलेल्या अहवालाच्या आधारे पदनिर्देशित अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (अन्न), परिमंडळ–१ यांनी दिनांक १५ जुलै २०२६ रोजी परवाना निलंबनाचा आदेश जारी केला.

# दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या स्मृतीचिन्हांचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे हस्तांतरण

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या कार्याचा गौरव म्हणून तयार करण्यात आलेली स्मृतीपत्रे उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली. बारामती येथे गुरुवारी प्रशासनाच्या वतीने हा कार्यक्रम पार पडला. विधानपरिषद आणि विधानसभा यांच्याकडून देण्यात आलेली स्मृतीपत्रे तसेच



तामिळनाडू विधानसभेच्या शोक प्रस्तावाची प्रत सुनेत्रा पवार यांच्याकडे प्रदान करण्यात आली. यावेळी उपविभागीय अधिकारी उत्तम दिघे आणि अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार यांनी स्मृतीपत्रांचे वाचन केले. तर तहसीलदार स्वप्नील रावडे यांनी तामिळनाडू विधानसभेच्या शोक प्रस्तावाचे वाचन केले. या कार्यक्रमाला बारामती एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी हनुमंत पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी चैतन्य कदम, दौंडचे उपविभागीय पोलीस अधिकारी बापूराव तडस, गटविकास अधिकारी किशोर माने यांच्यासह प्रशासनातील अधिकारी उपस्थित होते. अजितदादा पवार यांच्या सार्वजनिक जीवनातील योगदानाची नोंद घेत विधानमंडळ आणि विविध राज्यांकडून त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली आहे.

**सोने-चांदीचे दर**

शुध्द सोने –९६१०८१० रु.(१०ग्रॅम)

२२.कॅ सोने – ९४,७०० रु.(१०ग्रॅम)

चांदी – १,३०,००० रु. (प्र.किलो)

**कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती**

बाजारभाव ( क्विंटलमध्ये )

| | | |
|---|---|---|
| ज्वारी – | १६५० – | २००० |
| गहू – | २५०० – | ३००० |
| तूर – | ६१०० – | ६३९० |
| मूग – | ६५०० – | ७००० |
| उडीद – | ६००० – | ७००० |
| हरभरा – | ५६०० – | ५९०० |
| सोयाबिन – | ४१०० – | ४३५० |
| बाजरा – | २००० – | २३०० |
| तिळ – | ८२०० – | ९३०० |
| भुईमूग – | ५१५० – | ५३५० |
| मका – | २२०० – | २३०० |

# ग्राम सावंगा हत्याकांड आईची हत्या करणाऱ्या आरोपी मुलास जन्मठेपेची शिक्षा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – तालुक्यातील बेनोडा (शहीद) पोलीस स्टेशनच्या हद्दीत येणाऱ्या सावंगा येथे घडलेल्या एका थरारक हत्याकांडात स्वतःच्या जन्मदात्या आईची हत्या करणाऱ्या आरोपी मुलाला न्यायालयाने जन्मठेपेची जाहीर केली आहे. जिल्हा न्यायालय क्रमांक १ व अतिरिक्त सत्र न्यायालय वरुडचे न्यायमूर्ती ए.ए.पंचभाई यांच्या न्यायालयाने हा महत्त्वपूर्ण निर्णय सुनावला.

१ जुलै २०२३ रोजी सावंगा येथे ही मन सुन्न करणारी घटना घडली होती. कौटुंबिक कारणावरुन वाद होऊन आरोपी मुलगा मंजूर शहा मस्तान शहा (४३) याने



त्याची आई रजिया बी मस्तान शहा हिच्या डोक्यावर आणि कपाळा–वर धारदार शस्त्राने गंभीर वार केले.

या हल्ल्यात रजिया बी यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच ग्राम सावंगा येथील पोलीस पाटील शीला भोजराज आंडे आणि गावातील सय्यद फारुक यांनी घटनास्थळी धाव घेतली. तेथे रजिया बी या घरासमोरील खोलीत रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या आढळल्या तर आरोपी मुलगा घरातून फरार झाला होता. पोलीस पाटील शीला आंडे यांच्या तक्रारीवरुन बेनोडा पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून उपविभागीय पोलीस अधिकारी मोर्शी यांच्या मार्गदर्शनाखाली तपास अधिकारी एपीआय स्वप्निल ठाकरे व त्यांच्या टीमने वेगाने तपास करत आरोपी मंजूर शहा याला अटक केली. पोलिसांनी भक्कम पुरावे गोळा करुन दोषारोपपत्र न्यायालयात सादर केले. हा खटला वरुड येथील अतिरिक्त सत्र न्यायालयात चालविण्यात आला. सरकारी पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता म्हणुन जिल्हा न्यायालयाचे ॲड.प्रशांत देशमुख व मंगेश भागवत यांनी काम पाहिले. बेनोडा ठाण्याचे ठाणेदार विवेक देशमुख व सेशन कोर्ट वरुडचे हवालदार विवेक हेडाऊ यांनी साक्षीदारांची योग्य प्रकारे बाजू मांडण्यास मदत केली.

न्यायमूर्ती ए.ए.पंचभाई यांनी सर्व साक्षीदार आणि पुरावे तपासून १५ जुलै रोजी आरोपी मंजूर शहा मस्तान शहा याला कलम ३०२ अंतर्गत दोषी ठरवुन जन्मठेप आणि १० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. दंड न भरल्यास आणखी ४ महिने सक्तमजुरीची शिक्षा भोगावी लागेल, असेही न्यायालयाने आपल्या आदेशात स्पष्ट केले आहे.

# जयंत पाटलांकडून आधी फडणवीस अन आता एकनाथ शिंदेंची भेट

## महाराष्ट्राच्या राजकारणात मोठ्या घडामोडींचे संकेत

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मुंबईतील 'नंदनवन' या शासकीय निवासस्थानी काल रात्री उशिरा पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते जयंत पाटील आणि जितेंद्र आव्हाड यांनी भेट घेतली. जवळपास तासभर दोन्ही नेते नंदनवनवर होते भेटीदरम्यान फक्त जयंत पाटील आणि एकनाथ शिंदे यांच्यात अर्धा तास बंद दाराआड चर्चा झाली. शरद पवारांची राष्ट्रवादी एनडीएमध्ये सामील होणार अशा चर्चा असताना ही भेट महत्त्वाची मानली जात आहे. तर शरद पवारांची राष्ट्रवादी एनडीएमध्ये सामील झाल्यास जयंत पाटील यांना अर्थमंत्री पद मिळणार, या चर्चेला आणखी बळकटी मिळाली असून त्याच संदर्भात कालच्या बैठकीत तिन्ही नेत्यांमध्ये याबाबत चर्चा झाली असल्याची सूत्रांची माहिती आहे. दरम्यान, मागील दोनच दिवसांच्या आत जयंत पाटील यांनी आधी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आता एकनाथ शिंदे यांची भेट घेतल्याने राज्याच्या राजकारणात काही मोठं घडणार आहे का? असा सवाल उपस्थित केला जात आहे. मंगळवारी रात्री अचानक सुनील तटकरे आणि प्रफुल पटेल यांनी वर्षा बंगल्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. त्यावेळी जयंत पाटीलही त्याठिकाणी गेले होते. त्यानंतर दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येऊन शरद पवार गट महायुतीसोबत सत्तेत सामील होणार, अशी चर्चा सुरु झाली होती.










